# पूर्वांचलाची चित्र सफर - भाग ४




अरुणाचल प्रदेश मधल्या तवांगची मनसोक्त भ्रमंती करायचं माझं स्वप्न पुर्ण करून आम्ही तवांग सोडलं तरी त्या प्रदेशाने केलेलं गारूड अद्याप कमी झालेलं नाही. तळ्यांचं तवांग मागे पडलं तरी निसर्गाचे अनंत विभ्रम पाहातच से-ला-पासच्या दिशेने आमची गाडी मार्गक्रमण करत होती. नितांत सुंदर वाटा, कडे-कपाऱ्या आणि धबधबे, काही प्रवाही काही गोठलेले. जीवनच जणू संथगतीने वहातय कसली घाई नाही की कसली गडबड. भारत-चीन युद्धात पराक्रम गाजवलेल्या जसवंत सिंह यांच्या स्मारकाला भेट दिली. तिथल्या सैनिकांनी आग्रहपुर्वक दिलेला ‘अमृततुल्य’ चहा पिऊन पुढे निघालो आणि सारा आसमंत धुक्यात विरून गेला. याच प्रवासातली ही काही छायाचित्रं.


JASWANT GARH
WELCOME
TO THE BATTLE FIELD OF NURANANG
FOR A BREATH TAKING VIEW OF BUMLA
FOR A HOT CUP OF TEA
TO BE A PART OF HISTORY
Narendra Prabhu


Narendra Prabhu


Narendra Prabhu

दाट धुक्याची दुलई दूर झाली आणि नयनरम्य अशा देखाव्यांनी डोळ्याचं पारणं फिटलं. रस्त्याच्या दोन्ही बाजूला सदाहरीत जंगलातील असंख्य झाडं आपला नेहमीचा हिरवा रंग बाजूला ठेऊन विविध रंगांच्या छटा असलेली वस्त्र परिधान करून जणू निसर्गोत्सव साजरा करीत होती. सगळेच डोंगर पुष्पगुच्छ होऊन गेले होते. इतका विलोभनीय देखावा मी क्वचीतच पाहिला असेल. हिमालयाचा पर्वतमाथा पार करत आता आम्ही सखल प्रदेशाकडे पोहोचत होतो. बोमदिला, दिरांग, भालूकपॉग अशा प्रदेशातून पुन्हा तेजपूर या असम राज्याच्या शहरात दाखल झालो ते ब्रम्हपुत्रेच्या साक्षीने.







अरुणाचलच्या तवांगने जशी जादू केली तशीच जादू मेघालयनेही केली. शीतल उत्साही वातावरण आणि शांत जीवन. हवेतला ताजेपणा आणि बहरलेला निसर्ग. धबधबे, तलाव आणि डोंगर दऱ्या. मेघालयात जायचं आणि चेरापुंजी न पहाता यायचं असं कसं होईल. मेघालयात दुपारी दोन नंतर सगळे धग जमिनीवर उतरतात म्हणूनच तर त्या राज्याचं नाव मेघालय म्ह्णजेच ढगांचं घर असं आहे.




नभ उतरू आलं...! तळ्याच्या पाण्यावर उतरलेले हे ढग आहेत.

मेघालय गाठायचं आणि चेरापुंजीला न जाता यायचं हे कसं होणार. लहानपणापासून पुस्तकात वाचलेलं जगातील सर्वात जास्त पर्जन्यमान असलेलं ठिकाण म्हणजे चेरापुंजी, ते पहायची उत्सुकता तर होतीच, पण गेल्या दोन तीन वर्षापासून मोसिनराम या मोघालयातल्याच एका ठिकाणी चेरापुंजी पेक्षा जास्त पाऊस पडतो असं वाचनात आलं तेव्हा त्या दोन्ही ठिकाणी आम्ही जाऊन आलो. वाटेतच अशा अनेक गुहा लागल्या. एका ठिकाणी तर पिंडीवर नैसर्गिक रित्याच अभिषेक होत होता.



- नरेंद्र प्रभू

http://prabhunarendra.blogspot.com

http://shabdshabd.blogspot.com/